12 NOV 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘उंबळट’मधून चंदगडी भाषेला न्याय

## डॉ. नंदकुमार मोरे : प्रा. गोपाळ गावडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर, ता. ११ :** ‘अस्सल चंदगडी व्यक्तींच्या बोलीभाषेचा लहेजा व जगण्याची पद्धत उलगडणारे नितांत सुंदर ‘उंबळट’ हे व्यक्तीचित्रणाचे पुस्तक वाचकांना मोहीत करेल. या पुस्तकाच्या रूपाने चंदगडी बोली भाषेला न्याय मिळाला आहे,’ असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

येथील महावीर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांनी लिहिलेल्या ‘उंबळट’ या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. मोरे यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. महावीर महाविद्यालयाचा मराठी विभाग, माजी विद्यार्थी संघ, चंदगड तालुका मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने चंदगडी बोलीतील ‘उबंळट’ या व्यक्तीचित्रण पुस्तकाचे प्रकाशन झाले.



**कोल्हापूर : प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांनी लिहिलेल्या ‘उंबळट’चे प्रकाशन करताना मध्यभागी डॉ. नंदकुमार मोरे. शेजारी पी. एस. पाटील, विष्णू जोशीलकर, डॉ. राजेंद्र लोखंडे, गोपाळ गावडे आदी.**

डॉ. मोरे म्हणाले की, “व्यक्तीचित्रण लेखनाचा काळ ओसरला असताना डॉ. गावडे यांनी आवर्जून लिहिलेले हे व्यक्तिचित्रण महत्त्वाचे आहे. बोलीभाषेत ज्ञानाचे संचित असते. बोलीभाषेतून त्या त्या प्रदेशाच्या संस्कृतीचे संदर्भ प्रकट होतात. अशी बोलीभाषा वापरणारी माणसं ही प्रेमळ व कष्टाळू असतात. त्यांचे जगण्याचे विविध पदर गावडे यांनी पुस्तकात मांडले आहेत.”

प्रा. पी. एस. पाटील म्हणाले, “मराठी भाषेच्या कक्षा रुदावणारे हे पुस्तक आहे. लेखक शास्त्रज्ञ असतो, तो समाजातील व्यक्तींचे भाषेच्या रूपात संशोधन करतो.” महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी परिचय करून दिला. प्रा. डॉ. महांतेश हिरेमठ, इंद्रायणी गावडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विनोद कांबळे यांनी आभार मानले.


### लोकांच्या मनातील ओलावा

प्राचार्य राजेंद्र लोखंडे म्हणाले की, “गोपाळ गावडे हे संवेदनशील लेखक आहेत. महावीर महाविद्यालयाचे अनेक प्राध्यापक, संशोधक लेखन क्षेत्रात नावारूपास आले आहेत. त्यापैकी गावडे एक आहेत. त्यांनी आपल्या गावाच्या मातीतील व लोकांच्या मनातील मायेचा ओलावा चंदगडी भाषेतून ‘उंबळट’ या पुस्तकाव्दारे व्यक्त केला आहे. तोही भावणारी आहे.”

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा शुक्रवारी वर्धापनदिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा



हीरकमहोत्सवी वर्धापनदिन शुक्रवारी (दि. १८) सकाळी साडेआठ वाजता साजरा होणार आहे. त्यासाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, दापोलीतील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत प्रमुख उपस्थित असणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के असतील. वर्धापनदिनी विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्नित महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय सेवक, बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक, प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गौरव, प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्काराचे वितरण प्रमुख उपस्थितांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा १८ नोंव्हेबरला वर्धापनदिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी वर्धापन दिन शुक्रवारी, १८ नोव्हेंबरला साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे भूषविणार आहेत. गुणवंत शिक्षक व कर्मचारी, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य व शिक्षक, आदर्श शिक्षक, शिक्षिका पुरस्कारप्राप्त शिक्षकांच्या सत्काराचे आयोजनही यावेळी केले आहे. शिवाजी विद्यापीठात हे सर्व कार्यक्रम सकाळी साडेआठ वाजता होणार असून या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रकुलगुरू पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सवी वर्धापन दिन शुक्रवारी



कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सवी वर्धापन दिन शुक्रवारी (ता. १८) साजरा होत आहे. सकाळी साडेआठ वाजता ध्वजवंदन झाल्यानंतर कार्यक्रमास सुरुवात होईल. या वेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय डी. सावंत प्रमुख उपस्थित राहतील.

विद्यापीठातील गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची गुणवंत पाल्ये, बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्या सुमतीबाई पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त शिक्षक, प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कारप्राप्त व्यक्तींचा सत्कार करण्यात येणार आहे.

सकाळ



कोल्हापूर : ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ स्व. डी. बी. पाटील राज्यस्तरीय व्याख्यानमालेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. शेजारी इतर मान्यवर.

# वाचा, वेचा आणि साठवा : डॉ. शिंदे

**कोल्हापूर :** श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संस्थेच्या न्यू कॉलेज व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील व्याख्यानमाला व सांस्कृतिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आज उद्‌घाटन झाले. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. ते म्हणाले, ''जगातील प्रत्येक देशाचा इतिहास असे सांगतो की प्रत्येक क्रांतीमागे, लढ्यामागे, परिवर्तनापाठीमागे वक्ताच होता. आदर्श वक्ता होण्यासाठी प्रथम वाचा, वाचनातून महत्त्वाचे वेचा, वेचलेले साठवा आणि साठवलेले नेहमी आचरणात आणा.'' वैभव नायकवडी यांनी मार्गदर्शन केले. या संस्थेचे व्हाईस चेअरमन डी. जी. किल्लेदार, खजानिस वाय. एस. चव्हाण, उपप्राचार्य प्रा. एस. एन. इनामदार, राजेंद्र पाटील, जयंत पाटील, सविता पाटील, सुमन पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. विनय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. मनीषा नायकवडी व प्रा. उमा गायकवाड यांनी केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठात आज संख्याशास्त्रावर परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त संख्याशास्त्र अधिविभागामध्ये आज, शनिवार (दि. १२) 'नॉन पॅरामेट्रिक स्टॅटिस्टिकल मेथड्स' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवाद होणार आहे. यात अमेरिकेतील मिसिसिपी स्टेट युनिव्हर्सिटीचे प्रा. प्रकाश पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

12 NOV 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सिनेट'च्या ५० जागांसाठी १०० उमेदवारांत चुरस

## शिवाजी विद्यापीठ : तीन जिल्ह्यांतील ३३ केंद्रांवर सोमवारी मतदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाची शैक्षणिक ध्येय-धोरणे ठरविण्यात महत्त्वाची भूमिका असलेल्या अधिसभा (सिनेट), विविध अधिकार मंडळांच्या ५० जागांसाठी निवडणूक लागली असून, एकूण १०० उमेदवारांमध्ये चुरस रंगली आहे. या जागांसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ३३ केंद्रांवर सोमवारी (दि. १४) सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत मतदान होणार आहे. एकूण ३६ हजार ९८३ पदवीधर, शिक्षक मतदानाचा हक्क बजावणार आहेत. विद्यापीठातील परीक्षा भवनमध्ये बुधवारी (दि. १६) मतमोजणीची प्रक्रिया होईल.

या निवडणुकीसाठी विद्यापीठ विकास आघाडी विरुद्ध 'सुटा'चा समावेश असलेली शिव-शाहू आघाडी अशी लढत होत आहे. त्यामुळे शिक्षक, पदवीधर गटांतील जागांसाठी चुरस रंगली आहे. गेल्या १५ दिवसांपासून आरोप-प्रत्यारोपांनी प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकीतील मतदारांना पसंतीक्रमानुसार मतदान करावे लागणार आहे. पसंतीक्रम मराठी अथवा इंग्रजीमध्ये नोंदविता येईल. सिनेटमधील शिक्षक, पदवीधर प्रवर्गातील १९ जागांसाठी ४५ उमेदवार असल्याने एका प्रवर्गाची एक मतपत्रिका प्रत्येकी चार पानांची असणार आहे. मतदारांकडे निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट, वाहन परवाना, पॅनकार्ड, आधारकार्ड, आदी ११ पैकी एक ओळखपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवार, मतदारांबाबतच्या सूचना सभा व निवडणूक विभागाने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या आहेत. दरम्यान, या मतदानाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मतदान, मतमोजणीच्या प्रक्रियेसाठी १७५ कर्मचारी कार्यरत असणार आहेत.

### प्रवर्गनिहाय जागा, उमेदवार

| प्रवर्ग | जागा | उमेदवार |
|---|---|---|
| महाविद्यालयीन शिक्षक | ०८ | १४ |
| विद्यापीठ शिक्षक | ०३ | ०८ |
| नोंदणीकृत पदवीधर | ०८ | २३ |
| विद्यापरिषद | ०४ | ०९ |
| नऊ अभ्यासमंडळे | २७ | ४६ |

### 'सुटा'ची याचिका फेटाळली

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार या निवडणुकीत प्राचार्यांना शिक्षक मतदारसंघात मतदानाचा अधिकार मिळाला आहे. त्याबाबत 'सुटा'ने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. प्रचाराच्या पत्रकामध्ये न्यायालयाने आदेश देऊन या प्राचार्यांची नावे वगळण्यात आली आहेत, असे सुटाने छापले.सुनावणी होण्यापूर्वी चुकीची माहिती दिल्याबद्दल सुटावर विद्यापीठाने कडक कारवाई करावी. अशी मागणी विद्यापीठ विकास आघाडीचे सहकार्यवाहक डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केली.

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठाच्या ९ अभ्यास मंडळांच्या २७ जागांसाठी १४ नोव्हेंबरला मतदान

## ४६ उमेदवार निवडणूक रिंगणात

**कोल्हापूर, ता.११ (प्रतिनिधी)**

शिवाजी विद्यापीठाच्या नऊ अभ्यास मंडळांच्या २७ जागांसाठी दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी मतदान होत असून ४६ उमेदवार निवडणूक लढवित आहेत. या निवडणुकीसाठी दिनांक १४-११-२०२२ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान होणार आहे.

मतदान केंद्रामध्ये मतदानाचे दिवशी निवडणूक कामासाठी नेमलेला सेवकवर्ग तसेच स्वत: उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी तसेच मतदार हजर राहू शकतील. मतदानावेळी मतदाराकडे निश्चित केलेल्या ११ ओळखीच्या पुराव्यापैकी एक ओळखपत्र असणे आवश्यक आहे. मतदान यादीत नाव असल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस मतदान करता येणार नाही. विद्यापीठाच्या अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यासमंडळे या अधिकार मंडळासाठी शिक्षक व नोंदणीकृत पदवीधर संवर्गानुसार निवडणूका दि.१४ नोव्हेंबर, २०२२ रोजी ३३ मतदान केंद्रांवर घेण्यात येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
12 NOV 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रंग बदलणारे शेवाळ

## औषध निर्मितीत उपयोग; डोळे, त्वचा, हृदयासाठी फायदेशीर

**अमोल सावंत : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : आपल्या परिसरातील नदी, नाले, ओढे, झरे, तलाव, विहीर, अन्य जलस्त्रोतांत पावसाळा संपला की, हिवाळा ते उन्हाळ्यापर्यंत अनेक रंगांची शेवाळे दिसतात. मात्र, शिवाजी विद्यापीठाच्या पाणथळ परिसरात 'बर्ड बाथ' नावाची पाण्यावर लाल तवंग आणणारी अनोखे शेवाळ वनस्पती आढळली आहे. हेमॅटोकॉकस असे शास्त्रीय नाव असलेले हे शेवाळ पार्किन्सन (कंपवात), अल्झायमर (स्मृतीभ्रंश) रोगाचे लक्षण हाताळण्यास मदत करते, असे संशोधन झाले. या शेवाळातील काही संयुगांचा औषधामध्ये वापर करून उपचार करता येते, असे सिद्ध झाले आहे.

शास्त्रज्ञांच्या मते, हेमॅटोकोकस शैवाळ खाल्ल्यानंतर फ्लेमिंगो किंवा पेन्टेड करकोचा पक्ष्याच्या पिसांवरील लाल किंवा गुलाबी रंग तयार झाला असावा, असे मानले जाते. वनस्पतीशास्त्र विभागाच्या लीड बॉटनिकल गार्डनमध्ये तयार केलेल्या पाणथळ परिसरात असे शेवाळ पहिल्यांदाच आढळले.

वनस्पतीशास्त्र अधिविभागातील सहायक प्रा. डॉ. सचिन पाटील म्हणाले, ''क्लोरोफायसी वर्गातील वोल्व्होकेल्स गणातील क्लायमयडोमोनेसी कुळामध्ये या शेवाळाचे वर्गीकरण केले आहे. या कुळातील सर्व वनस्पती या एक पेशीय असतात. हेमॅटोकॉकस ही गोड्या पाण्यातील एकपेशीय शेवाळ वर्गीय वनस्पती असून, ते सूक्ष्म असते. ते अस्ताक्संथिन घटकाचा समृद्ध स्रोत म्हणून ओळखले जाते. जिथे अनेक पक्षी स्नान करतात, अशा पाणथळ परिसरात ते वाढते. संध्याकाळच्या सुमारास तलावाच्या पाण्याच्या पृष्ठभागावर हिरवा थर दिसल्याचे आम्ही पाहिले. दुसऱ्या दिवशी दुपारी भेट दिली, तेव्हा पाण्यातील तवंगाचा रंग लाल झाल्याचे दिसले. मग आम्ही रंग बदलणारे शेवाळाचा शोध घेऊ लागलो. संदर्भ शोधल्यानंतर रंग बदल दर्शविणारे काही शेवाळे आहेत, असे समजले.''



'बर्ड बाथ' नावाचे अनोखे रंग बदलणारे शेवाळ.

**"रंग बदलणाऱ्या हेमॅटोकोकस शेवाळाचे महत्त्व मोठे आहे. या शैवाळातील सुमारे चार ग्रॅम अस्ताक्संथिन १५०० रुपयांना विकले जाते. शिवाजी विद्यापीठाच्या पाणथळ परिसंस्थेत शेवाळ आढळते, ही महत्त्वाची घटना आहे.**

**- प्रा. आर. व्ही. गुरव, वनस्पतीशास्त्र अधिविभाग प्रमुख**

### हेमॅटोकोकस शेवाळाचे महत्त्व

- अँटी-ऑक्सिडेंटस् असणारे अस्ताक्संथिन मानवी शरिरातील मुक्त रॅडिकलचे प्रमाण कमी करते
- त्वचेतील ओलावा पातळी सुधारते
- त्वचा लवचिक करते, डोळे, त्वचेसाठी फायदेशीर
- वैद्यकीय क्षेत्र, सौंदर्यप्रसाधने, रंग देणाऱ्या द्रव्यात वापर, त्वचेची गुणवत्ता वाढविते
- त्वचेवरील सुरकुत्या, मुरुम कमी करते
- रोगप्रतिकार प्रणालीकरीता उपयुक्त
- हृदयाचे आरोग्य सुधारते